प्रातःकाल
www.pratahkal.com

‘जागतिक पर्यावरण दिना’निमित्त भिवंडीत वृक्षारोपण मोहीम

५१२ स्थानिक प्रजातींची लागवड

भिवंडी, दि. ०५ (वार्ताहर): जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने शुक्रवारी शहरातील विविध भागांमध्ये व्यापक वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात आला. शहरातील वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी तसेच ‘झाडे लावा, झाडे जगवा’ या संदेशाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

या मोहिमेअंतर्गत प्रभाग समिती क्रमांक १ ते ५ मधील विविध सार्वजनिक ठिकाणी स्थानिक प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. नाशिक रोडलगतचे आरिफ मोमीन उद्यान, शांतीनगर रोड परिसर, मनपा शाळा क्रमांक ७० शेजारील कब्रस्तान, अन्सारी मैदान, राजीव गांधी उड्डाणपूल परिसर, मनपाची नवीन प्रशासकीय इमारत, श्रीरंगनगर, खुदाबक्ष हॉल, टावरे क्रीडा संकुल, महेश पार्क तसेच अन्य उपलब्ध जागांवर वृक्षारोपण करण्यात आले.

महानगरपालिका आयुक्त अनमोल सागर (भा.प्र.से.) यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी महापौर नारायण चौधरी, खासदार सुरेश (बाळ्यामामा) म्हात्रे, आमदार महेश चौघुले, आमदार रईस शेख, नगरसेवक, लोकप्रतिनिधी तसेच विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मिळून ‘हरित भिवंडी’ घडविण्याचा संकल्प व्यक्त केला. भविष्यात २० हजार झाडांची लागवड करण्याचे उद्दिष्टही यावेळी जाहीर करण्यात आले.

या वृक्षारोपण मोहिमेत एकूण ५१२ स्थानिक प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. याशिवाय नदीनाका ते साईबाबा बायपास तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक ते चाविंद्रा मुख्य रस्ता या मार्गांवरील झाडांना ठोकलेले खिळे, लावलेले फलक, पोस्टर्स आणि तारा काढून ‘झाडे मुक्त’ मोहीमही राबविण्यात आली. झाडांवर जाहिराती व इतर साहित्य लावणाऱ्या दुकाने, गॅरेज आणि कार्यालयांना नोटिसाही बजावण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली.

आयुक्त अनमोल सागर यांनी नागरिकांनी या हरित उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा आणि वृक्षसंवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. शहराच्या पर्यावरणीय समतोलासाठी अशा मोहिमा सातत्याने राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वसई-विरार महापालिकेचा वृक्षारोपण उपक्रम; ‘वृक्ष दत्तक योजने’लाही प्रतिसाद

वसई, दि. ०५ (वार्ताहर) : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वृक्षप्राधिकरण विभागातर्फे राष्ट्रीय स्वच्छ वायू कार्यक्रम आणि माझी वसुंधरा अभियानाअंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शहर अधिक हरित व पर्यावरणपूरक बनविण्याच्या उद्देशाने महापालिका मुख्यालय परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

या उपक्रमामागे पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करणे, हरित क्षेत्र वाढविणे आणि नागरिकांमध्ये वृक्षसंवर्धनाची भावना रुजविणे हा प्रमुख उद्देश असल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी महापौर अजीव पाटील, उपमहापौर मार्शल लोपीस, आयुक्त पृथ्वीराज बी. पी. (भा. प्र.से.), सभागृह नेते प्रफुल्ल साने, विरोधी पक्षनेते मनोज पाटील, नगरसेवक-नगरसेविका तसेच अतिरिक्त आयुक्त, उपआयुक्त आणि विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

महापालिका क्षेत्रातील विविध भागांमध्ये टप्प्याटप्प्याने वृक्षारोपण सुरू असून रस्त्यांच्या दुतर्फा तसेच मोकळ्या भूखंडांवर देशी वृक्षांच्या रोपांची लागवड केली जात आहे. पिंपळ, वड, कडुलिंब, बहावा, जांभूळ, करंज आणि आवळा यांसारख्या पर्यावरणपूरक व दीर्घायुषी वृक्षांना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. यामुळे शहरातील हरित क्षेत्र वाढण्यास आणि पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होणार असल्याचे प्रशासनाने नमूद केले.

दरम्यान, नागरिकांच्या मागणीनुसार गृहसंकुले, क्रीडांगणे आणि इतर उपलब्ध जागांवर वृक्षलागवड करण्यासाठी ‘वृक्ष दत्तक योजना’ राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत महानगरपालिकेच्या वृक्षप्राधिकरण विभागामार्फत नागरिकांना वृक्षांची रोपे उपलब्ध करून दिली जात आहेत.

नवी मुंबई महापालिकेच्या मुख्यालयात प्लास्टिक बॉटल क्रशर मशीनचे उद्घाटन

नवी मुंबई, दि. ०५ (वार्ताहर) : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात प्लास्टिक बॉटल क्रशर मशीनचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी महानगरपालिकेचा प्रत्येक अधिकारी व कर्मचारी हा स्वच्छता आणि पर्यावरणाचा ‘ब्रँड ॲम्बेसेडर’ असल्याचे सांगत शहर स्वच्छता, प्लास्टिक प्रतिबंध आणि पर्यावरण संवर्धनासाठी सर्वांनी सक्रियपणे पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

मुख्यालयात आयोजित विशेष कार्यक्रमात आयुक्त डॉ. शिंदे यांनी कचऱ्याचे निर्मितीस्थळीच वर्गीकरण करणे, प्लास्टिक पिशव्यांऐवजी कापडी पिशव्यांचा वापर वाढविणे आणि ‘प्लास्टिक मार्शल’ म्हणून काम करण्याची गरज अधोरेखित केली. कोणत्याही चांगल्या उपक्रमाचे यश त्याच्या सुरुवातीतील आत्मीयतेवर अवलंबून असते. त्यामुळे पर्यावरण संवर्धनाची सुरुवात स्वतःपासूनच व्हायला हवी, असे त्यांनी नमूद केले.

महापालिका मुख्यालयाच्या तळमजल्यावरील दर्शनी भागात बसविण्यात आलेल्या प्लास्टिक बॉटल क्रशर मशीनचा शुभारंभ आयुक्तांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, डॉ. राहुल गेठे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे, विविध विभागांचे अधिकारी तसेच स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अटोसच्या सामाजिक दायित्व निधीतून रोटरी क्लब आणि बायोक्रक्स संस्थेच्या सहकार्याने ही यंत्रणा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी मशीनमध्ये प्लास्टिक बाटली टाकून आपला भ्रमणध्वनी क्रमांक नोंदवल्यानंतर त्यांना प्रोत्साहनपर गुण मिळणार आहेत. हे गुण ठराविक प्रमाणात जमा झाल्यानंतर उपयुक्त वस्तू भेटस्वरूपात दिल्या जाणार आहेत. अशा प्रकारच्या १२ यंत्रणा महापालिकेची रुग्णालये, बाजारपेठा आणि इतर वर्दळीच्या ठिकाणी बसविण्याची योजना असल्याची माहिती प्रशासनाने दिली. यावेळी आयुक्त डॉ. शिंदे यांनी शाळांमध्ये वृक्षरोपांची रोपवाटिका उभारणे आणि ‘बीज बँक’ हा अभिनव उपक्रम राबविण्याची घोषणाही केली. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करून भावी पिढी अधिक पर्यावरणपूरक घडविण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

motilal oswal Home Finance

मोतीलाल ओसवाल होम फायनांस लिमिटेड

ई-लिलाव वजा विक्रीसाठी जाहीर सूचना

कॉर्पोरेट कार्यालयः मोतीलाल ओस्वाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी रोड, एसटी डेपो समोर, प्रभादेवी, मुंबई – ४०००२५. सीएस क्रः ८२९१८८९८९८.

संकेतस्थळ : www.motilaloswalhf.com **ई-मेलः** hfquery@motilaloswal.com

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८ आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या तरतुदीसह सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल अॅसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्ता (मत्तांच्या) विक्रीसाठी १५ दिवसांची ई-लिलाव विक्री सूचना.

सामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदारांना/ हमीदारांना/ गहाणदारांना सूचना देण्यात येत आहे की, मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड (पूर्वी अस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) यांना गहाण ठेवलेली खालील मालमत्ता जे आहे जेथे आहे*, “जसे आहे तसे आहे* आणि जेथे आहे तेथे आहे* या स्वरूपात ऑनलाइन ई-लिलाव* द्वारे विक्री करण्यात येईल. सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियमावली, २००२ **च्या नियम ८ आणि ९ सह वाचलेल्या सरफेसी कायद्याच्या तरतुदींनुसार** खाली तपशिलामध्ये देण्यात आलेल्या माहितीनुसार motilaloswalhf.com संकेतस्थळाद्वारे विक्री करण्यात येईल :

ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ : २९-०६-२०२६ रोजी स. ११:०० वा ते दु. ०२:०० वा. (प्रत्येकी १५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)

कर्जदारा (रां) / हमीदारा (रां)/ कर्ज खाते	मागणी सूचना दिनांक आणि रक्कम	स्थावर मालमत्तेचे वर्णन	राखीव मूल्य, इरठे आणि इरठे सादरीकरणाचा शेवटचा दिनांक
एलएएनः एलएक्सव्हीए००४१६-१७००३०१८६ शाखाः वसई कर्जदारः मिजाणू इमानवाडीन मिर्झा मिर्झा सह-कर्जदारः शाहनर मिजाणू मिर्झा	रु. ३२८५९०/- (रुपये तीन लक्ष अठावीस हजार पाचशे नव्वद मात्र) करीता १०-०९-२०२५	सदनिका क्र. ००५ तळमजला श्री समर्थ अपार्ट नालासोपारा (पु) पालघर ० ० ४०१२०९ पालघर ठाणे, महाराष्ट्र	राखीव मूल्यः रु. ३,००,०००/- (रुपये तीन लक्ष मात्र) इरठेः रु. ३०,०००/- (रुपये एक तीस हजार मात्र) इरठे जमा करण्याचा शेवटचा दिनांक : २८-०६-२०२६

१. ही लिलाव प्रक्रिया ‘बिड डॉक्युमेंट’मधील (बोली दस्तऐवजातील) अटी व शर्ती आणि त्यामध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार राबविली जाईल. बोलीदारांना बोली प्रक्रियेबाबत माहिती व सहाय्य, ई-लिलावासाठी ठेवलेल्या सुरक्षित मालमत्तेचा तपशील आणि ऑनलाइन सादर करावयाचा (बोली अर्ज) मिळवण्यासाठी, **आमचे ई-लिलाव सेवा पुरवठादार ‘मेसर्स क्रेडरिझोल्यूशन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड’ यांच्या https://www.credauction.com** या वेब पोर्टलला भेट देता येईल. इच्छुक खरेदीदार याच पोर्टलवर लिलावाच्या अटी व शर्ती तसेच प्रक्रियेची माहिती पाहू शकतात. तसेच, ते **राकेश मनोहर कंदारे (९९६७३३७२८८) आणि सचिन रणसिंग राजपूत (८०९७२०३१८५) यांच्याशी संपर्क साधू शकतात (यांचा तपशील वरील वेब पोर्टलवर उपलब्ध आहे) किंवा त्यांच्या ‘सेंट्रलाइज्ड हेल्प डेस्क’शी +९१ ९१३७१०००२० या क्रमांकावर अथवा balram@credsolv.com या ई-मेल आयडीवर संपर्क साधू शकतात.**

स्थळः महाराष्ट्र / दिनांकः ०६.०६.२०२६ **स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी, मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड.**

भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल. **(पूर्वीचे नावः एस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड).**

बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

बँक ऑफ बडोदा, डॉ ॲनी बेझंट रोड/ वरळी नाका शाखा :

तुलसी विहार, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-१८. ई-मेल : Dbworl@Bankofbaroda.com

स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री नोटीस “परिशिष्ट- IV-ए [नियम ६ (२) आणि ८ (६) चे परंतुक पहा]

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ चे नियम ६ (२) आणि ८ (६) चे परंतुक सहवाचित सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनाशियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ च्या अंतर्गत स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री नोटीस.

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार, गहाणदार आणि जामीनदार यांना नोटीस देण्यात येते की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता जी सिक्युअर्ड क्रेडिटरकडे गहाण/प्रभारित आहे, जिचा ताबा बँक ऑफ बडोदा, सिक्युअर्ड क्रेडिटरच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती खाली नमूद केलेल्या खात्यातील/खात्यांमधील थकीत रकमेच्या वसुलीसाठी “जे जसे आहे तिथे”, “जे जसे आहे”, आणि “जे काही आहे” या तत्त्वावर विकली जाईल. कर्जदार/गहाणदार /जामीनदार/सिक्युअर्ड मालमत्ता/थकीत रक्कम/राखीव किंमत/ई-लिलाव तारीख आणि वेळ, इसारा रक्कम आणि बोली वाढीची रक्कम यांचे तपशील खाली नमूद केले आहेत -

अ.क्र. / लॉट क्र.	कर्जदार / जामीनदार / गहाणदार यांचे नाव आणि पत्ता	स्थावर मालमत्तेचे ज्ञात बोज्यासह सविस्तर वर्णन, जर काही असल्यास	एकूण थकीत रक्कम.	१. ई-लिलाव तारीख, २. ई-लिलाव वेळ (सुरुवातीची वेळ ते बंद होण्याची वेळ)	१. राखीव किंमत, २. इसारा रक्कम ठेव (ईरठे), ३. बोली वाढीची रक्कम	मालमत्ता ताब्याची स्थिती (प्रातिनिधिक / प्रत्यक्ष)	मालमत्ता पाहणीची तारीख आणि वेळ
१	**१. श्री नवीन कुमार दया शंकर यादव** ए) रुम क्र. १०, चाळ क्र. २, ओमसाई चाळ, जीवदानी नगर, साबेगाव, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२ बी) फ्लॅट क्र. १०६, १ ला मजला, बी विंग, साई स्वप्न अपार्टमेंट, दत्त मंदिराजवळ, मावलपाडा तलाव, विरार (पूर्व) जिल्हा पालघर-४०१३०५ **२. श्री दया शंकर रामहित यादव (सह-कर्जदार)** ए) रुम क्र. १०, चाळ क्र. २, ओमसाई चाळ, जीवदानी नगर, साबेगाव, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२ बी) फ्लॅट क्र. १०६, १ ला मजला, बी विंग, साई स्वप्न अपार्टमेंट, दत्त मंदिराजवळ, मावलपाडा तलाव, विरार (पूर्व) जिल्हा पालघर-४०१३०५ **३. सौ. वर्षा यादव (जामीनदार)** ए) रुम क्र. १०, चाळ क्र. २, ओमसाई चाळ, जीवदानी नगर, साबेगाव, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२ बी) फ्लॅट क्र. १०६, १ ला मजला, बी विंग, साई स्वप्न अपार्टमेंट, दत्त मंदिराजवळ, मावलपाडा तलाव, विरार (पूर्व) जिल्हा पालघर-४०१३०५ **४. सौ. द्रोपदी (जामीनदार)** ए) रुम क्र. १०, चाळ क्र. २, ओमसाई चाळ, जीवदानी नगर, साबेगाव, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२ बी) तो सर्व भाग आणि हिस्सा ज्याअंतर्गत, फ्लॅट क्र. १०६, १ ला मजला, बी विंग, साई स्वप्न अपार्टमेंट, दत्त मंदिराजवळ, मावलपाडा तलाव, विरार (पूर्व) जिल्हा पालघर-४०१३०५	फ्लॅट क्र. १०६, १ ला मजला, विंग बी, मोजमाप ३५८ चौ. फूट सुपर बिल्ट अप इमारत ज्याचे नाव “साई स्वप्न अपार्टमेंट क्र. २” जी जमीन सर्व्हे क्र. १७५, हिस्सा क्र. १, मोजमाप ०-०८-० पैकी एकूण मोजमाप ०-१४-० वर बांधली आहे, जी वसई विरार महानगर पालिका, तालुका आणि नोंदणी उप-जिल्हाः वसई २, विरार, जिल्हा पालघर-४०१३०५ च्या हद्दीत मौजे विरार पूर्व येथे स्थित आहे. **बँकेला ज्ञात बोजाः माहीत नाही.**	**रु. २१.५४ लाख + लागू न झालेले व्याज + इतर शुल्क**	**१. ई-लिलाव तारीखः १३-०७-२०२६, २. ई-लिलाव वेळः सुरुवातीची वेळः दु. २.०० वा. ते बंद होण्याची वेळः सायं. ६.०० वा.**	**१. राखीव किंमतः रु. २४,८७,०००.००, २. इसारा रक्कम ठेव (ईरठे) : रु. २,४८,७००.००, ३. बोली वाढीची रक्कमः रु. २०,०००.००**	**प्रत्यक्ष**	**०२-०७-२०२६, सुरुवातीची वेळः दु. १.०० वा. ते बंद होण्याची वेळः सायं. ४.०० वा.**

विक्रीच्या सविस्तर अटी आणि शर्तींसाठी, कृपया संकेतस्थळ लिंक https://www.bankofbaroda.in/e-auction आणि ऑनलाइन लिलाव पोर्टल https://baanknet.com ला भेट द्या/पहा. तसेच, इच्छुक बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्यांशी मोबाईल क्रः९५४९११४८९९/८६५२६३९८२७ वर संपर्क साधू शकतात.

तारीखः ०६-०६-२०२६ ठिकाणः मुंबई **श्री अंशुमन मंत्री, प्राधिकृत अधिकारी, बँक ऑफ बडोदा**

विक्री सूचना

रोटोमॅक ग्लोबल प्रायव्हेट लिमिटेड (लिक्विडेशनमध्ये) लिक्विडेटर - सीए अनिल गोयल
लिक्विडेटरचा पत्ता : पहिला मजला, ६४, ओखला इस्टेट, फेज III, मोदी मिल्स जवळ, नवी दिल्ली ११००२०. ईमेल : assetsale1@aaainsolvency.in, rotomac.global@aaainsolvency.com, anilgoel@aaainsolvency.com मो. - ८८००८६५२८४
(श्री वसीम आणि अँड. हर्ष गुप्ता आणि अँड. रितु राज)

ई-लिलाव — आयबीबीआय (लिक्विडेशन प्रक्रिया) विनियम २०१६ च्या विनियम ३२(ए) नुसार मालमत्तेची विक्री
ई-लिलावाची तारीख व वेळ : ८ जुलै, २०२६ वेळ - दुपारी ०३:०० ते सायं. ०५:०० पर्यंत
(शेवटच्या ०५ मिनिटांमध्ये अमर्यादित विस्तारासह)
ईएमडी सादर करण्याची शेवटची तारीख : ६ जुलै, २०२६ सायं. ०७.०० वाजेपर्यंत

विक्री सूचना

रोटोमॅक ग्लोबल प्रायव्हेट लिमिटेड (लिक्विडेशनमध्ये) यांच्या मालमत्तांची विक्री, मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, अलाहाबाद खंडपीठ यांनी दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी तयार केलेल्या लिक्विडेशन इस्टेटचा भाग म्हणून केली जात आहे. ही विक्री आयबीबीआयच्या नामनिर्दिष्ट ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर केली जाईलः **https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home**

मालमत्ता	ब्लॉक	राखीव किंमत	ईएमडी रक्कम	वाढीव मूल्य
ऑफिस नं. ५११, ५१३ आणि ५१५, पाचवा मजला, पिनॅकल कॉर्पोरेट टॉवर, (रॉयल ऑफिस जवळ), प्रह्लाद नगर, सॅटेलाईट, विजलपूर, अहमदाबाद, क्षेत्रफळ ६,१५२ चौ. फूट	ए.	४.५० कोटी	४५ लाख	१० लाख
सर्वे नं. ६२, टी.पी. स्कीम नं. ११, फायनल प्लॉट नं. ७७, गाव – राखियाल, तालुका – सिटी, जिल्हा अहमदाबाद, क्षेत्रफळ २,०२२ चौ. मीटर	बी.	६.१२ कोटी	६१.२० लाख	१० लाख
फ्लॅट नं. ८०३, आठवा मजला, जमिनीवरील कार पार्किंगसह, “श्याम वृंद अपार्टमेंट”, धनंजय टॉवर समोर, उप-प्लॉट नं. १२८, टी.पी. स्कीम नं. ३, (अंतिम जुना सर्वे नं. ८१/२), गाव – विजलपूर, तालुका – अहमदाबाद – ४ (पालडी) – ३८०००४, क्षेत्रफळ २३३ चौ. यार्ड	सी.	१.४४ कोटी	१४.४० लाख	५ लाख
सर्वे नं. ७५६/१, ७५६/२, खाता नं. ८२९, खुली जमीन, मौजे – कोलट, तालुका साणंद, जिल्हा अहमदाबाद, क्षेत्रफळ २४,९५८ चौ. मीटर	डी.	३९.८७ कोटी	३.९८ कोटी	२० लाख
युनिट नं. २०१, २०२, दुसरा मजला, परिसर नं. ६३/२ चा भाग, द मॉल कानपूर ऑफिस नं. २२३ आणि २२३ए, दुसरा मजला, परिसर नं. ६३/२ चा भाग, द मॉल सिटी सेंटर, कानपूर नगर, क्षेत्रफळ २९५९.६ चौ. फूट	ई.	२.५२ कोटी	२५.२० लाख	५ लाख
खुली जमीन असलेला परिसर नं. २४/६, तुलसा कोठी, मॉल रोड, कानपूर नगर, क्षेत्रफळ ४३२ चौ. मीटर	एफ.	८.६४ कोटी	८६.४० लाख	१० लाख
जमीन परिसर नं. सीएफ-II, औद्योगिक क्षेत्र पनकी, साइट नं. ३, कानपूर नगर, परिसर नं. डी-२, डी-३, डी-४, डी-५ आणि डी-६, औद्योगिक क्षेत्र पनकी, साइट नं. ३, कानपूर नगर, क्षेत्रफळ २०,७७०.५१ चौ. मीटर	जी.	४०.१४ कोटी	४.०१ कोटी	२० लाख
परिसर नं. सीएफ-II, डी-२, डी-३, डी-४ आणि डी-५ आणि डी-६, औद्योगिक क्षेत्र पनकी, साइट नं. ३, कानपूर नगर येथील प्लांट आणि मशिनरी	एच.	२.४३ कोटी	२४.३० लाख	५ लाख
जमीन, इमारत, प्लांट आणि मशिनरी एकत्रित स्वरूपात, परिसर नं. सीएफ-II, औद्योगिक क्षेत्र पनकी, साइट नं. ३, कानपूर नगर, परिसर नं. डी-२, डी-३, डी-४, डी-५ आणि डी-६, औद्योगिक क्षेत्र पनकी, साइट नं. ३, कानपूर नगर, क्षेत्रफळ २०,७७०.५१ चौ. मीटर	आय.	४२.५७ कोटी	४.२५ कोटी	२० लाख
जमीन इमारत, सर्वे नं. ४१५ (पैकी), गाव – मोरैया, तालुका – साणंद, अहमदाबाद, जमीन क्षेत्रफळ ९,८२४.०५ चौ. मीटर, इमारत ५०,३०६ चौ. फूट	जे.	२४.३० कोटी	२.४३ कोटी	२० लाख
सर्वे नं. ४१५ (पैकी), गाव – मोरैया, तालुका – साणंद, अहमदाबाद येथील प्लांट आणि मशिनरी	के.	१.३५ कोटी	१३.५० लाख	५ लाख
जमीन, इमारत, प्लांट आणि मशिनरी एकत्रित स्वरूपात, सर्वे नं. ४१५ (पैकी), गाव – मोरैया, तालुका – साणंद, अहमदाबाद	एल.	२५.६५ कोटी	२.५६ कोटी	२० लाख
सर्वे नं. ७८८ पैकी (खाता नं. ९२२), गाव – राजोडा, तालुका – बावला, अहमदाबाद, भगवती फ्लोर मिलच्या मागे असलेली जमीन, क्षेत्रफळ १२,८२५.०३ चौ. मीटर	एम.	२२.५९ कोटी	२.२५ कोटी	२० लाख

महत्त्वाची नोंद :

१. ई-लिलाव “जिथे आहे तिथे”, “जसे आहे तसे”, “जे काही आहे ते” आणि “कोणत्याही दाव्याशिवाय” या आधारावर घेतला जाईल. अशा विक्रीमध्ये कोणत्याही प्रकारची हमी किंवा नुकसानभरपाई नसून, आयबीबीआय ई-लिलाव पोर्टलवर बँकनेटमार्फत मंजूर सेवा प्रदात्यांद्वारे विक्री केली जाईलः https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home

२. इनसॉल्व्हन्सी अँड बँकरप्सी बोर्ड ऑफ इंडिया (लिक्विडेशन प्रक्रिया) विनियम, २०१६, अनुसूची I “विक्री पद्धत” कलम १(५अ) नुसार, बोलीदारांनी जाहीर करणे आवश्यक आहे की ते संहितेच्या कलम २९अ अंतर्गत अपात्र नाहीत; अपात्रता आढळल्यास ईएमडी जप्त केली जाईल.

३. हे लक्षात घ्यावे की ब्लॉक जी, एच आणि आय हे परस्पर संबंधित आहेत तसेच ब्लॉक जे, के आणि एल हेदेखील परस्पर संबंधित आहेत. लिक्विडेटर, एससीसी सदस्यांच्या सल्ल्यानुसार, लिलाव दस्तऐवजात नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार एच१ बोलीदार निवडण्याचा अधिकार राखून ठेवतो.

सर्व अटी व शर्ती एएए इनसॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स एलएलपी यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या निविदा दस्तऐवजात पाहाव्यातः https://insolvencyandbankruptcy.in/rotomac-global-private-limited, तसेच ईएमडी सादर करण्यापूर्वी आणि प्रक्रियेत सहभागी होण्यापूर्वी आयबीबीआय ई-लिलाव पोर्टल म्हणजेच बँकनेटच्या संकेतस्थळावर पाहाव्यात.

स्वाक्षरी/-
अनिल गोयल
रोटोमॅक ग्लोबल प्रायव्हेट लिमिटेडच्या बाबतीत लिक्विडेटर
आयबीबीआय (नोंदणी क्रमांक : आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-००११८/२०१७ १८/१०२५३)
पत्ता : पहिला मजला, ६४, ओखला इस्टेट, फेज III, (मोदी मिल्स जवळ), नवी दिल्ली ११००२०
ईमेल : rotomac.global@aaainsolvency.com,
anilgoel@aaainsolvency.com, assetsale1@aaainsolvency.in
संपर्क क्र. : श्री वसीम : ८८००८६५२८४

दिनांक : ०६/०६/२०२६
ठिकाण : नवी दिल्ली

Change Of Name

I HAVE CHANGED MY NAME FROM DIPESH VINODKUMAR DHANKANI TO DEEPESH VINOD DHANKANI AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM VINODKUMAR SANTOSHKUMAR DHANKANI TO VINOD SANTOSHKUMAR DHANKANI AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM AFREEN MOHAMMAD JUNAID SHAIKH TO AFREEN BANO MOHAMMAD JUNAID SHAIKH AS PER DOCUMENTS

I, VIJAYA JANARDHAN BALDUDHE ALIAS VIJAYA PUNDALIK LOGADE D/O JANARDHAN BALDUDHE W/O PUNDIK R/O BONDGAON DEVI, WARD NO.4, BONDGAON DEVI, VTC: ARJUNI MORGAON, DISTRICT: GONDIYA, STATE: MAHARASHTRA-441701,

I HAVE CHANGED MY NAME FROM MOHAMMED SHAKLAIN KHALILULLAH ANSARI TO MOHAMMED SAQLAIN KHALILULLAH ANSARI AS PER DOCUMENTS HAVE CHANGED MY NAME TO VIJAYA JANARDHAN BALBUDHE.

I HAVE CHANGED MY NAME FROM MOMIN SHAHBAZ MOHD SALIM TO SHAHBAZ MOHAMMED SALIM MOMIN.AS PER AFFIDAVITE

Change Of Name

I HAVE CHANGED MY NAME FROM IMTIYAZ BASHIR AHMAD KONDIKAR TO IMTIYAZ BASHIR KONDEKAR AS PER DOCUMENTS

I AM CHANGING MY NAME FROM SABRE ALAM TO SABRE ALAM MOHAMMAD SUBARATI IDRISI FOR PASSPORT ISSUANCE

I HAVE CHANGED MY NAME FROM SALEEMA BARKATALI PIRANI TO SALIMA SALMAN MERCHANT AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM PATEL AFLAH AASIF TO AFLA ALTAF DHOLE AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGE MY NAME FROM MOHAMMAD SAJID / MOHD SAJID ABDUL QADIR SHAIKH TO MOHAMMAD SAJID ABDUL QADIR SHAIKH AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM AMAL TO AMAL MOHAMED HABIB AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM MOHAMMED HABIB MEERA SHAH TO MOHAMED HABIB MEERA SHA AS PER DOCUMENTS

I SALAUDDIN NOORUDDIN BHATKAR HAVE CHANGE MY NAME FROM SALAUDDIN NOORUDDIN DAUD BHATKAR TO SALAUDDIN NOORUDDIN BHATKAR AS PER DOCUMENTS

Change Of Name

I HAVE CHANGED MY NAME FROM KHAN MOHAMMED ZAID NISAR TO MOHAMMED ZAID KHAN OORYAJI AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM TARAMATI MARKANDEY KUNWAR TO TARAMATI KUNWAR AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM BALACHANDRAN MUTHURAMAN IYER TO BALACHANDRAN MUTHURAMAN AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM SHAINAZ BANO MOHAMED HUSAIN MULLA TO SHAHNAZ MOHAMMAD HUSSAIN MULLA AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM FIRDOS MOHAMED AFTAB SOPARI WALA TO FIRDOS MOHMED SOPARI WALA AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM FAISAL MOHAMED AFTAB SOPARI WALA TO FAISAL MOHMED AFTAB SOPARI WALA AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM MOHAMMED FAIYAZ TO MOHAMMED FAIYAZ ABUBAKAR LABBAI AS PER DOCUMENTS.

जाहिरात छोटी प्रसिद्धी मोठी

Change Of Name

I HAVE CHANGED MY NAME FROM ABUBAKKER SHAIKH TO ABUBAKAR MUSTAFA LABBAI AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM SABIRA / SABIYA SHAIKH TO SABIRA ABUBAKAR LABBAI AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM SALMA KHAN TO SALMA ARSHAD KHAN AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM SALEEMUDDIN ALIMUDDIN QURESHI TO SALIMUDDIN ALIMUDDIN QURESHI AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM RAJANI BALA TO RAJANI PRAVIN KUMAR AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM DESHMUKH, NAEELA A. SATTAR TO DESHMUKH NAILA AKBAR AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM KHANDESHI KAYSARI WALIMIYAN TO KAISARI SAMIR KHAN DESHMUKH AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM NILESH DEEN